mpc news.in
राहा एकदम अपडेट, कधीही, कुठेही!



# Pune News : 15 वाड्यावस्त्यांवर बाल हक्क विषयक जागृती कार्यशाळा यशस्वी

By **Sudesh** On **फेब्रुवारी 14, 2022**

ठळक बातम्या पुणे शिक्षण संवाद



**एमपीसी न्यूज- 15 वाड्यावस्त्यांवर बाल हक्क विषयक जागृती कार्यशाळा यशस्वीपणे पार पडली. वर्क फॉर इक्वॅलिटी सामाजिक संस्थेच्या वतीने बालकांना त्यांच्या हक्कांविषयी जागृत करण्याच्या उद्देशाने 13 फेब्रुवारी रोजी कार्यशाळा आयोजित केली. वाडी – वस्ती आणि वंचित समाजातील 80 मुलांनी या कार्यशाळेत सहभाग नोंदविला.**

कार्यशाळेत बालहक्क कार्यकर्ता आणि पुणे जिल्ह्यातील मुलांच्या हक्कांवर सक्रियपणे काम करणारे नेटवर्क action for the rights of child pune च्या सदस्य मयुरी मदन सुषमा यांनी मार्गदर्शन केले.

‘ ब-याचवेळा आम्हाला बालविवाह विषयी माहिती वेळेवर मिळू शकत नसल्यामुळे आम्ही योग्य वेळेस त्यावर प्रतिबंध करू शकत नाही. बऱ्याच वेळा या यंत्रणेतील आणि स्थानिक पातळीवरील महत्वाचे आणि जबाबदार घटक जसे आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, सरपंच यांना देखील अशा प्रकारच्या केसेस हाताळण्याचे कौशल्य आणि माहिती नसल्यामुळे आणि समाजाच्या दबावामुळे बालकांच्या हक्कांचे उल्लंघन सर्रास होताना दिसते. या घटनांवर निर्बंध आणण्यासाठी मुलांना व त्यांच्या माध्यमातून मोठ्यांना जागृत करण्याची गरज आहे,’ असे वर्क फॉर इक्वॅलिटी संस्थेच्या संस्थापिका प्रभा विलास म्हणाल्या.

स्नेहल ठक्कर, श्रद्धा तेलंगे, दिव्या गिरी, संजीवनी कांबळे, आस्मा शेख, हर्षल उबाळे, रेणुका, राजवैभव, सागर, सुरज यांनी कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी मोलाची कामगिरी केली.

breaking news in marathi | child rights | child rights awareness | child rights awareness workshop | latest marathi news | latest news in marathi | Latest Update | Local News | marathi news | mpc latest news | MPC news | PCMC News | Pune | pune city | Pune news | Top Marathi news | Top News | trending news | एमपीसी न्यूज | ताज्या बातम्या